**प्रेस नोट दिनांक ११/०८/२०१९**
**चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर**
**व्यसनमुक्ती शिबीर आयोजि केले बाबत.**

चंदननगर पो. स्टे. येथे दिनांक १०/०८/२०१९ रोजी सायंकाळी १७.३० वा. पासुन ते १९.०० वा. पर्यंत दरम्यान आनंदवन व्यसन मुक्ती केंद्र, खराडी, पुणे येथील केंद्र संचालक श्री. चांदेकर यांचे अध्यक्षतेखाली शिबीर आयोजित करण्यात आलेले होते. शिबीरास मा. सहाय्यक पोलीस आयुक्त साो, येरवडा विभाग श्री. रामचंद्र देसाई साहेब, वरिष्ठ पोलीस निरीक्षक – कृष्णा इंदलकर, कर्मचारी असे हजर होते. शिबीरामध्ये पोलीस ठाणे हद्दीमधील युवक व शालेय विद्यार्थी हजर होते. आनंदवन व्यसन मुक्ती केंद्र संचालक श्री. रामचंद्र देसाई यांनी सर्वांना अलिकडे युवक, विद्यार्थी व नागरिकांमध्ये वाढत चाललेली व्यसनाधिनता बंद करणेसाठी व त्यापासुन होणारे दुष्परिणामांची माहिती दिली. दारु, गांजा, अफु, इतर मादक पदार्थ यांचे व्यसनाधिनतेमुळे कुटुंबावर होणारे आघात, व्यक्तीच्या शरीरावर होणारे परिणाम व त्यामुळे वाढलेले मृत्युचे प्रमाण यांना प्रतिबंध होणेसाठी व्यसने बंद करुन त्यामधुन बाहेर पडुन स्वतःचे जिवनशैली सुधारणेसाठी आवाहन केले आहे. सदर शिबीराचा घेण्यात आलेला फोटो खालीलप्रमाणे –

